सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

**क्रमांक : एलजेआर-१९२७/प्र.क्र.५६५/२०२४/जाहिरात** **दिनांक : ०७ जुलै, २०२६**

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२४, जा.क्र. ०१३/२०२६ दिनांक ३० एप्रिल, २०२६ परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ देण्याबाबत**

आयोगामार्फत दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा – २०२४, जा.क्र. ०१३/२०२६ करीता दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याचा कालावधी दिनांक ०१ मे, २०२६ ते २१ मे, २०२६ असा विहित करण्यात आला होता.

**२.** शासन पत्र, विधी व न्याय विभाग, क्रमांक : संकीर्ण-११२६/५५१/प्र.क्र.११३/कार्या-३, दिनांक ०१ जुलै, २०२६ अन्वये कळविल्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल रिट याचिका (सिव्हील) क्र 1110/2025 प्रकरणी मा. न्यायालयाने दिनांक २२ मे, २०२६ रोजी आदेशित केल्यानुसार **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२४** करीता **अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक ०८ जुलै, २०२६ पासून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशांपर्यंत** वाढविण्यात येत आहे.

**३.** उपरोक्त कार्यवाहीच्या अनुषंगाने दिनांक ०२ ऑगस्ट, २०२६ रोजी पूर्वनियोजित दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२४ चे आयोजन पुढे ढकलण्यात येत असून परीक्षेचा सुधारित दिनांक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

सं. पां. देशमुख
उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.